**अति महत्वाचे**

दुरध्वनी क्रं : **22618987**
**22708738**
Email:- mismumuniversity@gmail.com

**सांख्यिकी विभाग**
फोर्ट, मुबंई– ४०००३२.

**क्रं.सांख्यिकी/MIS/159/159/२०१४.**

परिपत्रक:–

**विषय:–** व्यवस्थापकीय माहिती पध्दत (MIS) शैक्षणिक वर्ष सन –२०१४–१५ – संकेतस्थळावर ऑनलाईन माहिती नोदंणीबाबत.

**संदंभ** :–क्र.उशिसं/एमआयएस/२०१४–१५/९२१०, दिनांक : ५/११/२०१४.

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भास अनुसरून प्राचार्य/संचालक आणि सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था याची लक्ष वेधु इच्छितो की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निणर्य घेण्यासाठी सन २०१४–१५ या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहिती अत्यंत आवश्यक आहे, त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालया व संस्थाकडून ऑनलाईन पद्धतीने विवरण पत्रांमध्ये माहिती मागविण्यात येत आहे.

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, यांनी विकसित केलेल्या व्यवस्थापकीय माहिती पद्धतीद्वारे (MIS) गतवर्षाप्रमाणेच २०१४–१५ या शैक्षणिक वर्षाकरिता www.dhemis.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावयाची असून, तेथे उपलब्ध असलेल्या विवरण–पत्रामध्ये संबंधित माहिती Online भरावयाची आहे.

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, यांच्यामार्फत **सन २०१४–१५** या शैक्षणिक वर्षाकरिता संकेतस्थळावर माहिती नोंदविताना काही घ्यावयाच्या महत्वाच्या सुचना खालील प्रमाणे:–

**“ १) सदरील माहिती महाराष्ट्र शासन व संचालनालय यांस ऑनलाईन पद्धतीद्वारे थेट व त्वरीत उपलब्ध होत असल्याने व त्याचे महत्व लक्षात घेऊन त्या माहितीच्या नोंदणीची प्रक्रिया दि. ३०/११/२०१४ पर्यत पुर्ण करण्यात यावी.**

**२) विद्यार्थ्याच्या पटसंख्येबाबतची माहिती दि. ३० संप्टेबर २०१४, या संदर्भ दिवसाची वर्षनिहाय नोंदविण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण होण्याबाबतची माहिती सन २०१४ मध्ये घेण्यात आलेली वार्षिक परीक्षा अथवा सेमिस्टर पद्धती आल्यास व्दितीय, चतुर्थ आणि सहाव्या सेमिस्टरची वर्षनिहाय नोंदविण्यात यावी. तसेच विद्यापीठातील/ महाविद्यालयातील पदव्युत्तर आणि नॉन एआयसीटीई मान्यता प्राप्त अभ्यासक्रमाची नोंद एमआयएस मध्ये करण्यात यावी. आर्थिक बाबीची माहिती आर्थिक वर्ष एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीकरिता नोंदविण्यात यावी.**

**३) Staff Information Model मधील सन २०१४–१५ हे वर्ष सेट करण्यात यावे, सदरील मोडयुल मधील सर्व बाबींची माहिती भरणे आवश्यक आहे. याकरिता मागील वर्षी नोंदविण्यात आलेली कार्यालये / महाविद्यालये यांची माहिती, अनुदानित अथवा विना–अनुदानित अभ्यासक्रम, तुकडया, मंजुर, भरलेली व रिक्त पदे, कार्यरत, सेवा–निवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी इत्यादींची माहिती संबंधित बाबींसमोर अचूकतेने दर्शविण्यात आली आहे, ती पडताळण्यात यावी व**

आवश्यक त्या ठिकाणी योग्य त्या दुरूस्त्या करून माहिती सुधारित करण्यात यावी.

**P.T.O.**



वेतनाबाबतची माहिती नोंदविताना प्रत्येक महिन्याची प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांची माहिती नोंदविण्यात यावी.

४) **Academic Information Model** मधील बाबींची नोंद घेताना ज्या महाविद्यालयांना शासनाकडून कोणत्याही बांबीकरिता अनुदान उपलब्ध होत नाही त्यांनी योजनातंर्गत/ योजनेतर **(Plan/Non-plan)** बाबतची माहिती भरू नये. विद्यार्थ्यांकडून जमा होणा—या फी बाबतची माहिती नोंदताना संबंधित महिन्यापर्यंत एकुण फी व त्याचा प्रकारानुसार तपशिल नोंदविण्यात यावा. स्कॉलरशिप/ फ्रीशिप बाबतची माहिती सन २०१४—१५ या वर्षातीलच उपलब्ध झाल्यावर (माहे जानेवारी अथवा फेब्रुवारी २०१५ मध्ये) नोंदविण्यात यावी. सन २०१३—१४ मधील माहिती नोंदविण्यात येऊ नये. ”

वरील सर्व बाबींचा विचार करता आपणांस काही अडचणी उद्‌भवल्यास खालील ठिकाणी संर्पक साधावा.

तत्संबंधीतील माहिती ऑनलाईन पदधतीने विहित विवरण—पत्रांमध्ये तात्काळ भरून पाठवावी, जेणे करून महाराष्ट्र शासन व संचालनालय यांना माहिती मिळणे सोयीस्कर होईल.

| Contact Person | Office | Land Line No. | Email |
|---|---|---|---|
| Nodel Officer University of Mumbai | University of Mumbai, Fort, Mumbai | 022-22708738<br>022-22618987 | mismumuniversity@gmail.com |
| MIS Call Centre | Director of Higher Education, Pune. | 9921447149<br>9822889877 | mhaishesno@gmail.com<br>dilipkadam7149@gmail.com |

मुंबई — ४०००३२. उपकुलसचिव,

दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१४ (जनसंपर्क विभाग/ सांख्यिकी कक्ष)